978-81-948515-7-8

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक समता"

प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव
शि.गु.रा.गे. शिंदे महाविद्यालय, परंडा जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना:-**

हिंदू धर्मातव्यक्तीला स्थान नाही. हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते हिंदू धर्मातील मुख्य दोष होय. हिंदू धर्माची रचना वर्णाच्या कल्पनेवर केली आहे. एका माणसाने दुसऱ्याशी कसे वागावे याची शिकवण हिंदू धर्मात नाही. एका वर्गाने विद्या शिकावी दुसऱ्या वर्गाने शस्त्र धरावे, तिसऱ्याने व्यापार करावा चौथ्याने फक्त सेवा करावी, अशी या धर्माने कर्तव्याची विभागणी केलेली आहे. ती अन्यायकारक आहे. विद्या, शस्त्रे आणि पैसा यांची प्रत्येक माणसाला जरुरी असते. ही गोष्ट जो धर्म विसरतो आणि जो एकला सज्ञान करण्यासाठी बाकीच्यांना अज्ञानात ठेवतो तो धर्म नसून लोकांना बौद्धिक गुलामगिरीत ठेवण्याचा कावा आहे. जो धर्म एकाच्या हाती शस्त्र देतो व दुसऱ्याला निशस्त्र करतो, जो धर्म काहीना धन संपादनाचा मार्ग मोकळा करतो व बाकीच्यांना आपली उपजीविका दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची अनुज्ञा देतो तो धर्म वरिष्ठ वर्गाच्या हिंदूंनी वरिष्ठ वर्गाच्या संवर्धनाकरिता रचलेला डाव आहे. शुद्रांवर या धर्माने सामाजिक बौद्धिक गुलामगिरीच लादली आहे. हिंदू धर्माने शूद्राला व्यवसाय स्वातंत्र्य दिलेले नाही. संपत्तीचा संचय करण्याचा त्याला हक्क नाही. वेदाध्ययनाचाच नव्हे, तर वेदांचे श्रवण करण्याचा अधिकार ही मनूने नाकारला आहे. या धर्मात प्रत्येक जात ही एका पेक्षा उच्च व एका पेक्षा नीच अशी रचना असल्याने सर्व मानव समान आहेत. हा मानवतावादी विचार या धर्मात नाही.

भारतीय समाजाला लागलेला एक दुर्धर रोग म्हणून अस्पृश्यतेचा उल्लेख केला जातो. जन्माने जात ठरत असल्याने दलित, पीडित जातींची दु:खे डॉ. बाबासाहेबांच्या वाट्याला आली होती. स्वावलंबन, आत्मोद्धार, स्वाभिमान हा आंबेडकरांच्या चळवळीचा उद्देश होता. उष: काल होता काळ रात्र झाली. ज्या समाजाने बाबासाहेबांच्या विचारसरणीशी दगाबाजी केली. बाबासाहेबांच्या कृपेमुळेच आरक्षणाचा आधार घेऊन तो समाज स्वत:च्या पायावर उभा राहण्यास सक्षम झाला होता. प्रबुद्ध भारत बनविण्याचे स्वप्न आम्ही विसरलो. आमच्या समाजातील ३० लाखापेक्षा जास्त व्यक्ती डॉक्टर, वकील, प्राध्यापक अधिकारी आहेत; परंतु तो समाज स्वत:च्या कार्यातच पायावरच गुंतून आहे. समाजाकडे पाहण्यासाठी आता वेळच नाही.

आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचे रूपही दिले पाहिजे. राजकीय लोकशाहीला तिला आधारभूत अशी सामाजिक लोकशाही नसल्यास टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तिचा अर्थ आहे, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांना

जीवनाचे सिद्धांत म्हणून मान्य करणारी जीवनप्रणाली, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव सिद्धांत म्हणजे एकच, भिन्न भिन्न तत्वे म्हणता येणार नाहीत. या त्रयीत ती अशा त-हेने संघटित झाली आहेत की, त्यापैकी कोणत्याही एका दुसऱ्या पासून वेगळे केल्यास लोकशाहीचा विशिष्ट हेतूच पराभूत होतो. स्वातंत्र्य हे समते पासून वेगळे करता येत नाही. समता स्वातंत्र्यावेगळी करता येत नाही. स्वातंत्र्य व समता यांचा बंधूभावापासून विच्छेद संभवत नाही. समते शिवाय स्वातंत्र्य व्यक्तिगत उपक्रमशीलतेस मारक ठरेल. बंधूभावापासून स्वातंत्र्य आणि समतेचा उगमच संभवत नाही. त्याच्या अंमलबजावणीस मग पोलीसच हवा. भारतीय समाजात दोन गोष्टी चा अभाव आहे. हे सत्य मान्य करुनच आपण सुरुवात केली पाहिजे. एक म्हणजे समता सामाजिक दृष्टीने भारतातील आपला समाज हा श्रेणी युक्तविषमतेच्या सिद्धांतावर आधारलेला आहे. हा समाज एखाद्या उतरंडी सारखा आहे. आणि त्याचा अर्थ आहे काहींची उन्नती आणि बाकीच्यांची अधोगती आर्थिक दृष्टीने आपला समाज असा आहे की त्यात काही जवळ अलोट संपत्ती आहे, तर बहुसंख्यांक घोर दारिद्र्यात राहतात. २६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंगतीच्या जीवनात प्रवेश करीत आहोत.राजकारणात आपल्या जवळ समता असेल तर आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राजकारणात आपण एक मनुष्य एक मत, आणि एक मत एक किंमत, या सिद्धांताला मान्यता देत पण आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात आपल्या सामाजिक, आर्थिक रचनेमुळे 'एक माणूस एक मूल्य'या तत्त्वास आपण नाकारत राहिलो तर आपल्या राजकीय लोकशाहीचे नष्टचर्य ओढावेल. शक्य होईल त्या क्षणी आपण ही विसंगती दूर केली पाहिजे. अन्यथा या प्रतिनिधी सभेने अत्यंत मेहनतीने घडवलेला राजकीय लोकशाहीचा इमला विषमतेने ग्रस्त आणि त्रस्त असलेले लोक उध्वस्त करून टाकतील.

डॉ. आंबेडकरांना आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात करण्यास भाग पाडले ते भारतातील विषमतेने! हि विषमता सामाजिक स्तरापासून सुरू होऊन तिने वैयक्तिक स्तरावरील व्यक्तींचे जीवन ग्रासून टाकले होते. धर्मांतरापूर्वीपासून बाबासाहेबांनी अत्यंत पोटतिडकीने हा ज्वलंत प्रश्न मांडला. प्रसिद्ध विचारवंत जेम्स बाल्डविन यांनी म्हटल्याप्रमाणे लोक जागृतीच्या दृष्टीने एकोणिसाव्या शतकातील प्रयत्न महाराष्ट्राच्या सामाजिक पायाभरणीचे आहेत. हिंदू धर्म ग्रंथ हिंदू समाजाचा पाया आहे. वेद, स्मृती, श्रुती व पुराणे आधी धर्मग्रंथाच्या मूलभूत आधारावर हिंदु समाजाची इमारत आज शेकडो वर्षापासून उभी आहे.

धर्मांतरानंतरचा दोन दशकांचा काळ हा खऱ्या अर्थाने सामाजिकस्थित्यंतराचा काळ होता असे म्हणावयास पाहिजे.शैक्षणिक क्रांतीची सुरुवात तर बाबासाहेबांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करून केलीच होती आणि महाराष्ट्रातील मुंबई, कोकण, मराठवाडा इत्यादी ठिकाणी त्यांच्या शाखा होत्या. 'वंचितांना उत्कृष्ट शिक्षण' देण्यासाठी ही सोसायटी झटत होती. त्यामुळे शिक्षित धर्मांतराच्या सामाजिक क्रांतीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जशी सहभागी होती, त्याच प्रमाणे अशिक्षित, उपेक्षित, दैन्यावस्थेत जगणारा फार मोठा वर्ग या समाज क्रांतीच्या तेजस्वी आणि सन्मानपूर्वक दिलेल्या बौध्द धम्माच्या दिक्षेने प्रज्वलित झाला

होता. हे आत्मभानाचे जाज्वल्य त्यांना त्यांच्या आयुष्यात चहूबाजूने फुलविण्यात कारणीभूत ठरले. केवळ एका धम्मदीक्षेच्या प्रसंगाने लक्षावेधी व्यक्तींचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक उत्थान झाले.

डॉ. बाबासाहेब नेहमी म्हणत होते, ज्यावेळी माझ्यापुढे राष्ट्रहित की स्वसमाजहित असा प्रश्न उद्धवेल त्यावेळी मी माझ्या स्वसमाजहितापेक्षा राष्ट्रहिताला अधिक महत्त्व देऊन आमचे काहीही अहित झाले तरी ते आनंदाने पत्करीन. त्याचबरोबर डॉ.आंबेडकर असे स्पष्टपणे भारताला सांगत होते यासाठी हजारो वर्षे सर्व प्रकारच्या गुलामगिरीत सर्वस्व हरपलेल्या अस्पृश्य समाजाला शासनकर्ती जमात बनविण्याचा माझा अढळ संकल्प आहे. देशाच्या राजसत्तेत योग्य हिस्सा मिळवण्याचा आम्हाला पूर्ण हक्क आहे, त्यासाठी प्राणपणाने आपला लढा जिंकला पाहिजे. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश- 'जनता' १२ एप्रिल १९४७ जयंती खास अंक)डॉ आंबेडकरांचे अखिल भारतीय समाज क्रांतीच्या वाटचालीत मुख्य स्थान आहे. अस्पृश्यांच्या गुलामगिरीचा प्रश्न बाबासाहेबांनीसर्वांसमोर आणला आणि त्यांच्यासारखा नेता मिळाल्याने अंधारात चाचपडत असणाऱ्या अस्पृश्य समाजाला तेजस्वी मार्ग दिसू लागला. बाबासाहेबांच्या आधी परमहंस सभेचे दादोबा पांडुरंग, आर्य समाजाची स्थापना करणारे दयानंद सरस्वती, सत्यशोधक समाज स्थापित करणारे महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इत्यादींनी अस्पृश्य निवारणाचे कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज अस्पृश्य समाजातील तरुण त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. बहुजन समाजाचा उद्धार होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार हा तळागाळातील जनतेपर्यंत झाला पाहिजे. म्हणून दोन्ही संस्थानातील सर्व धर्मांच्या व विशेष करून अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ही मदत केली जाई.

डॉ. आंबेडकर समाज क्रांतिकारक होते. त्यांना समाज परिवर्तन घडवून आणवयाचे होते.त्यामुळे त्यांचा सामाजिक नियम हा आंबेडकर विचार विश्वाचा केंद्रबिंदू मानावा लागेल. डॉ. आंबेडकरांचे समाज चिंतन प्रगती आणि परिपूर्ण होते हे समजण्यासाठी त्यांच्या सामाजिक विचाराचे पैलू स्त्री शिक्षण आणि स्वातंत्र्य, जाती व्यवस्था, धर्मविषयक चिंतन, समाज परिवर्तनातून समाजक्रांती, दलित आंदोलन, व दलित गुलामगिरी विरुद्ध संघर्ष, घटना परिषद, स्त्री पुरुष समानता, राखीव जागा यांना समाजव्यवस्थेत मांडण्याचे कार्य केले. आपल्या देशात ब्रिटिशांचे आगमन आणि त्याबरोबर आलेली पाश्चिमात्य संस्कृती यांच्या आघाताने सामाजिक विचाराचे खऱ्या अर्थाने आंदोलन सुरू झाले. शिक्षण, कायदा, राजकीय व सामाजिक विचार प्रवाह, जीवन या नव्या पद्धती व प्रेरणा या सर्व नव्या आल्याने देशातील सामाजिक जीवनातील सर्व व्यासपीठे हादरली.आधुनिकता हे मूल्य संबंध जीवनाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करु लागले.

व्यक्तिगत जीवनात निर्बंध लादल्यामुळे येथे व्यक्ति स्वातंत्र्याचा कसा लोप झाला आहे. याचे विवेचन करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, खावे काय, प्यावे काय, उठावे कसे, बसावे कसे, असल्या गोष्टी सुद्धा धर्माचे नियम आहेत.ईश्वर व मनुष्य यामधील संबंध आणि

978-81-948515-7-8-------------------------------------------------------------------
पोकळ नीती-नियम इतक्या पुरतेच इतर धर्माप्रमाणे हिंदु आपले कार्यक्षेत्र मर्यादित केलेले नाही. हिंदू धर्माप्रमाणे दुसऱ्या कोणत्याही धर्मात इतके सामाजिक निर्बंध नाहीत. मानवी समाज व व्यवहार यांचे आकलन करताना त्यांचे अनेक प्रकार आहेत हे स्पष्ट आहे. निवळ धार्मिक, संस्कृती, सामाजिक व आर्थिक असा एकाच पद्धतीचा वा भागाचा विचार करून संपूर्ण समाजाचे व व्यवहाराचे आकलन होईल असे समजणे मूर्खपणाचे आहे.मानवी व्यवहार वैयक्तिक स्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा यांचे मूल्य म्हणून समाजाने भांडवलशाही या सुरुवातीच्या काळात स्वीकारले व नंतर साम्राज्यशाही वसाहती निर्माण झाल्या. बाजारपेठ विकसित झाल्यावर राज्यकर्त्यांना राजे, सरदार, धर्मा मार्तंड वा उच्चवर्णीयांना नको असले तरी भांडवली विकासाची अपरिहार्य गरज म्हणून व्यक्ती स्वातंत्र्य व प्रतिष्ठा हे मूल्य जगभर कमी अधिक प्रमाणात पसरले त्याचा परिणाम म्हणजे सर्व व्यक्ती समान हे तत्त्व आचरणात आले आहे. स्त्री पुरुष समानता, धर्मातील व्यक्तींची समानता, श्रीमंत-गरीब, काळा- गोरा, उच्च-नीचजात विरहित समानता हे सर्वजन व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य स्वीकारले तरच शक्य आहे.

**संदर्भसूची:-**

१) लक्ष्मण, डॉ. प्रा. कोत्तापल्ले -सामाजिक प्रशासन-प्रकाशन, कल्पना प्रकाशन, नांदेड वर्ष २००० पृ. क्र.८८

२) मनोहर, डॉ. यशवंत, डॉ. आंबेडकर वादी विद्रोही निबंध १९९२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्ध धम्म, १९८८.

३) प्रदीप, डॉ. आगलावे-'समाज शास्त्रीय संकल्पना',श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. पृष्ठ.२३४.

४) कीर,धनंजय-डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, १९५७.

५) कसबे, डॉ. रावसाहेब-डॉ. बाबासाहेब व मार्क्सवाद, सुगावा प्रकाशन, पुणे १९४०.

६) फडके, य. दि-आंबेडकरी चळवळ, श्री विद्या प्रकाशन, पुणे १९९०.

७) खोब्रागडे, डॉ. दीपककुमार (मुख्य संपादक) दीक्षाभूमी गौरव ग्रंथ खंड-२ प्रकाशक, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर१४ ऑक्टो, २०१३.